# ३ ग्रामीण अर्थव्यवस्था आणि समाज

(अ) कृषी उत्पादने, पाणी संसाधनाचे नियोजन, कृषी तंत्रज्ञान व पीकपद्धती

(ब) महसूल व्यवस्था, ग्रामीण समाजरचना.

## (अ) कृषी उत्पादने, नगदी पिके, पाणी संसाधनाचे नियोजन, कृषी तंत्रज्ञान व पीकपद्धती

प्राचीन काळापासून भारतातील लोकांचा शेती हाच मुख्य व्यवसाय आहे. आजही ६५% लोकांचा शेती हा व्यवसाय आहे. मध्ययुग त्याला अपवाद नाही. बहुसंख्य लोक खेड्यात राहत असत. खेडेगाव हा प्रशासनातील अंतिम घटक असून जवळजवळ प्रत्येक खेडे स्वयंपूर्ण व अधिकाधिक स्वावलंबी असे. पण अशा खेड्यातील लोकांच्या चरितार्थाचे मुख्य साधन शेती व्यवसायच होता. या उपप्रकरणामध्ये आपणाला त्या शेती व्यवसायात मध्ययुगीन काळात काढली जाणारी नियमित उत्पादने कोणती होती? रोकड पिके कोणती? शेती व्यवसायाला पाणीपुरवठ्याच्या योजना होत्या काय? आणि असतील तर त्या कोणत्या स्वरूपाच्या होत्या? शेतीचे तंत्रज्ञान काय होते? शेती व्यवसाय शेतकरी कसे करत असत? आणि शेवटी ग्रामीण भागात शेतकऱ्यांना अर्थपुरवठा कोण व कसा करत होते? या गोष्टींचा विचार करावयाचा आहे.

### कृषी उत्पादने

मध्ययुगात देशात शेती उत्पादनात दैनंदिन उपजीविकेची अन्नधान्ये आणि व्यापारी स्वरूपाची नगदी पिके असे दोन प्रकार होते. पण प्रामुख्याने अन्नधान्यांची उत्पादने अधिक होती. त्यापैकी गहू, तांदूळ यांसारख्या उत्पादनाचा काही प्रमाणात व्यापार चालत असे. अन्नधान्यांची उत्पादने म्हणजे जिरायती पिके म्हणता येईल. या प्रकारातील महत्त्वाची कृषी उत्पादने खालीलप्रमाणे देता येतील.

१. **ज्वारी :** दक्षिण भारतात महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेशात हे पीक घेतले



आजच्या काळात हे पीक खरीप व रब्बी या दोन्ही सिझनमध्ये (मौसमात) घेतले जाते. पण मध्यम काळात मोठ्या प्रमाणावर रब्बी पीक असावे. हे व्यापारी पीक नव्हते. पण मुख्यत्वे खाद्यान्न म्हणून त्याची गरज व उपयोग होत असे.

२. **बाजरी :** हे देखील खाद्यान्न असून ज्वारीपेक्षा मोठ्या प्रमाणावर अधिक प्रदेशांत हे पीक घेतले जात होते. उत्तरेतील दिल्ली, गुजरात, आग्रा, राजस्थान, मुलतान, महाराष्ट्र इ. प्रदेशांत उत्पादन होते.

३. **तांदूळ :** मोठ्या प्रमाणावर हे उत्पादन घेतले जाई. उत्तर भारताबरोबर पूर्व व पश्चिम किनार प्रदेशात मोठ्या प्रमाणावर तांदूळ उत्पादन केला जाई. तांदळाच्या अनेक जाती, प्रकार होते व आजही आहेत. १७५० साली काही वर्षे बंगालमध्ये राहिलेला परकीय प्रवासी रॉबर्ट ऑर्म लिहितो की, बंगालमधील जमीन फार सुपीक होती. थोड्या श्रमाने पुष्कळ उत्पन्न देणारा प्रांत बंगालप्रमाणे पृथ्वीत दुसरा नव्हता. येथे तांदळाचे पीक मुख्य होते. त्या वेळी फुटकळ विक्रीत एक पैशाला शेर तांदूळ मिळत असे. दुसरी धान्ये, भाज्या, फळफळावळ ह्यांची तर लयलूट होती. उसाची साखर जिकडे-तिकडे होत असे. त्याप्रमाणे तांदूळ उत्पादनाबद्दल समकालीन मजकूर मिळतो.

४. **गहू :** उत्तर भारतात गव्हाचे सर्वाधिक कृषी उत्पादन होते. आग्रा, अलाहाबाद, लाहोर, दिल्ली, मुलतान, अजमेर, गुजरात, बिहार इ. प्रदेशांत उत्पादन घेतले जात असे. प्रामुख्याने श्रीमंत लोक याचा वापर करत. शासनाला यापासून महसूल मिळत असे. आय. एच. कुरेशी आपल्या 'दि ॲडमिनीस्ट्रेशन ऑफ मुघल एम्पायर' मध्ये (पान १७५) लिहितात, मुघल सत्ताधीश कृषी उत्पादन करताना राज्याच्या आर्थिक स्थितीचा विचार करत असत. त्या दृष्टीने मुख्यत्वे तांदूळ व गहू ही उत्पादने निर्यात केली जात असत. कृषी उत्पादने घेताना प्रजेला पुरेसे अन्नधान्य निर्यातीसाठी योग्य उत्पादने आणि उद्योगधंद्यांना पूरक उत्पादने या तीन घटकांचा विचार केला जाई.

५. **कडधान्ये :** लोकांच्या दैनंदिन आहारात कडधान्यांचा वापर व आवश्यकता फार असते. प्रत्येक शेतकरी आपणाला आवश्यक एवढी कडधान्ये पिकवीत असतो. तसेच काही प्रदेशांत त्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर असून अंतर्गत व्यापारातील कडधान्ये हा एक महत्त्वाचा घटक होता. कडधान्यांमध्ये मूग, मसूर, तूर, उडीद, मटकी, हुलगा इ. पिकांचा समावेश होतो. भारताच्या दक्षिण, उत्तर दोन्ही भागांत ही पिके घेतली जात. याबरोबरच वरई, नाचणी ही अन्नधान्ये उत्पादित होत होती.

६. **विविध प्रकारची फळे :** मध्ययुगीन भारतात विविध प्रकारच्या फळांचे उत्पादन होत असे. अर्थात, आजच्याप्रमाणे नियोजनपूर्वक आणि केवळ उत्पन्नाचे साधन म्हणून त्या काळात फळांचे उत्पन्न एवढ्या मोठ्या प्रमाणावर नसावे. किंबहुना विविध प्रकारच्या फळबागांचे प्रमाण मर्यादित असावे. आंबा, चिंच, बोर, खजूर, बदाम, डाळिंब, लिंबू, केळी, फणस इ. फळांची झाडे असत. अशा लागवडीस काही प्रमाणात प्रोत्साहन पण दिले जाई. अकबर,

Scanned with CamScanner

जहांगिर यांसारख्या बादशहांनी फळांच्या बागा लावण्यास प्रोत्साहन दिले. शिवकालात दादो कोंडदेवाने महाराष्ट्रात शिवापूरमध्ये आंब्याची बाग लावली होती.

## नगदी पिके

शेतकऱ्यांना पैसा मिळवून देणाऱ्या पिकांना नगदी पिके म्हणतात. जीवनावश्यक अन्नधा गरजेएवढे पिकवून शेतकरी अशी नगदी पिके घेत असत. अशा उत्पादनांचा कारखानदारीसा उपयोग होई आणि मोठ्या प्रमाणावर निर्यातपण केली जाई.

**१. कापूस :** हे फार महत्त्वाचे नगदी पीक असून त्यापासून पैसा मिळत असे. भारता बंगाल, विदर्भ, गुजरात, लाहोर, दिल्ली इ. ठिकाणी कापसाचे उत्पादन घेतले जाई. कापसापासू कापड तयार केले जाई. भारतातील कापड व्यवसाय जगप्रसिद्ध असून त्याची मोठ्या प्रमाणाव निर्यात होत असे. ऐन-ए-अकबरी, विदेशी प्रवाशांचे वृत्तांत, ईस्ट इंडिया कंपनीच्या नोंदी इ संदर्भाच्या आधारे के.एम.चिटणीस यांनी मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था भाग ३ पा १७ वर म्हटले आहे की, जवळजवळ १६० प्रकारचे कापड भारतात व ५० प्रकारचे काप मुघल भारतात तयार होत असे. तर मराठेकालीन उद्योगधंद्यामध्ये ११ प्रकारच्या कापडा दरामध्ये सर्वांत महाग १७५ रु. तर स्वस्त २० रु. दर दिले आहेत. यावरून भारतात मध्ययुगा कापड व्यवसाय किती मोठ्या प्रमाणात चालत असेल व त्याला अनेक देशांत किती मागणी असेल याची कल्पना येते. त्यासाठी कापसाचे उत्पादन प्रचंड प्रमाणावर होत होते हे लक्षा येते. म्हणजे ते एक महत्त्वाचे नगदी पीक ठरते.

**२. मसाल्याचे पदार्थ :** भारतात लवंगा, वेलची, दालचिनी, जिरे, जायपत्री, मिरे य मसाल्यांच्या पदार्थांचे उत्पादन प्रचंड प्रमाणावर होत असे. हे सर्व मसाल्याचे पदार्थ होत. य पदार्थांना प्राचीन काळापासून जगभर अनेक देशांत मोठ्या प्रमाणावर मागणी होती. त्यामुळे निर्यातीमध्ये मसाल्याचे पदार्थ मुख्यत्वे असत. मध्ययुगीन व्यापार या प्रकरणात अधिक तपशील दिला आहे.

**३. नीळ :** भारतात अनेक प्रदेशांत निळीचे मळे असत. मोठ्या प्रमाणावर उत्पादन होई त्याचा व्यापार निर्यात होत असे. त्यापासून पैसा मिळत असे.

**४ तेलबिया :** शेंग, करडई, तीळ, मोहरी अशा तेलबियांचे उत्पादन होई. गुजरात, विदर्भ, कर्नाटक येथे शेंगाचे उत्पादन होई. तर उत्तर भारतात मोहरी पिकविली जाई. त्यापासू तेल तयार करण्याचा मोठा उद्योग असून ते काम विशिष्ट जातिजमाती करत असत. अन्नधान्याप्रमाणे लोकांना दैनंदिन जीवनात हा आवश्यक पदार्थ होता. त्यामुळे शेतकऱ्यां त्यापासून पैसा मिळत असे.

**५. तंबाखू :** तंबाखूची सुरुवात इ.स. १६०० चे सुमारास प्रथम पोर्तुगिजांनी केली व हळूहळू सर्वत्र प्रसार झाला. मुघल कालखंडात राजपरिवार, उच्चवर्गीय लोक पान-तंबाखूचे मोठे शौकीन होते. तंबाखू व त्यापासूनच्या अन्य उत्पादनाचे ते मोठ्या प्रमाणावर सेवन करीत. इतर लोकही तंबाखूचे सेवन करीत त्यामुळे त्याला मागणी खूप असे. साहजिकच त्याचे उत्पादन पण केले जाई. भारतात बंगाल, बऱ्हाणपूर, कर्नाटक इ. प्रदेशांत पीक घेतले जाई.



**६. ताग :** भारतातील मुख्यत्वे बंगाल प्रांतात तागाचे फार मोठ्या प्रमाणावर उत्पादन केले जाई. त्यापासून वस्तू बनविल्या जात. त्याला देशात व परदेशातही खप असे.

**७. ऊस :** भारतात सर्वत्र काही प्रमाणात पण मुख्यत्वे बंगाल, बिहार, अलाहाबाद, अवध प्रांत या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर उसाचे उत्पादन घेतले जाई. रॉबर्ट ऑर्म याने बंगाल प्रांतातील ऊस व त्यापासून तयार होणाऱ्या साखरेबद्दल केलेले वर्णन मागे आले आहेच. त्यामुळे ऊस एक नगदी पीक होते.

**८. केशर :** हे एक विशेष असे महत्त्वाचे उत्पादन असून त्यासाठी भारतातील काश्मीर प्रसिद्ध होते.

**९. इतर पिके :** याशिवाय हळद, नारळ, सुपारी, हिंग, सुंठ, भाजीपाला यांसारख्या उत्पादनांचाही उल्लेख केला पाहिजे.

## पाणी संसाधनाचे नियोजन ★

जीवसृष्टीला पाण्याची आवश्यकता फार असते. किंबहुना पाणी म्हणजेच जीवन होय. पाण्याचे हे महत्त्व व आवश्यकता सदासर्वकाळ कायम आहे. अलीकडे पाण्याचा उग्र बनत चाललेला प्रश्न सर्वपरिचित आहे. त्यामुळे पाण्याची उपलब्धता, त्याचा योग्य वापर म्हणजेच पाण्याच्या संसाधनाचे व्यवस्थापन यांच्या अभ्यासाला महत्त्व आहे. मध्ययुगीन कालखंडात भारतात पाण्याची उपलब्धता आणि शेतीला पाणीपुरवठ्याच्या योजना काय होत्या ? याचा आपणाला येथे विचार करावयाचा आहे.

मध्ययुगातील शेती व्यवसायाचे स्वरूप कोरडवाहू किंवा जिरायत असेच होते. मुख्यत्वे पावसाच्या पाण्यावर आधारित शेती होती. पाण्याखालील क्षेत्र म्हणजे बागायती शेतीचे प्रमाण अल्प होते. त्यातही बारमाही बागायत तर अगदी अल्प होते. कारण त्या प्रमाणात शेतीला पाणीपुरवठ्याच्या योजना दिसत नाहीत. पारंपरिक स्वरूपाने विहिरी किंवा पाटाच्या पाण्यावर शेती केली जाई. त्याचे प्रमाण कमी होते.

जमिनीला पाणी खालीलप्रमाणे तीन पद्धतींनी मिळत असे.

**१. पाटस्थळ :** नदी-नाले किंवा गावाजवळून वाहणारे ओढे बांध घालून अडविले जात. उतारानुसार तेथून पाट काढून शेतीला पाणी दिले जाई. त्याला आडव्या पाटाचे पाणी असेही म्हणत. अर्थात अशा पाण्याखाली मर्यादित क्षेत्र येत असे. शासनाच्या वतीने किंवा बऱ्याच वेळा लोक एकत्र येऊन सहाकार्याने, श्रमदानाने हे बांध घालीत असत. पावसाच्या प्रमाणावर ते पाणी अवलंबून असे. त्यामुळे त्याचा वापर बारमाही होत नसे. अशा सिंचनाखाली येणाऱ्या जमिनीचे मालक म्हणजे शेतकरी आपापसात तोंडी करार करूनही पाण्याच्या वापराचे नियोजन करीत असत. ॲबे कॅरे या फ्रेंच प्रवाशाने लिहिल्यानुसार कोकणातील अनेक गावांनी डोंगरातून पडणारे पाणी व जलधारांचा उपयोग शेतीसाठी केला होता.

**२. मोटस्थळ :** विहिरीतील पाण्याच्या वापराखाली येणारी जमीन म्हणजे मोटस्थळ होय. विहिरीतील पाणी दोन-चार बैलांचा वापर करून मोटेच्या साहाय्याने काढून ते पिकांना दिले जाई. मोट या साधनावरून त्याला 'मोटस्थळ' असे नाव मिळाले आहे. महाराष्ट्रात अगदी


Scanned with CamScanner

गतशतकापर्यंत आपणाला सर्वत्र अशा प्रकारची व्यवस्था माहीत आहे. पण अबुल फ लिहितो की, पंजाबमधील कृषी सिंचनात विहिरींचा मोठ्या प्रमाणावर उपयोग केला ज असे. पाण्याचा ओघ बघून व अंदाज घेऊन, आपल्या शेताच्या कडेला विहीर खोद पाणीपुरवठ्याची व्यवस्था करणे ही पद्धत भारतात सर्वत्र अगदी प्राचीन काळापासून अस्तित्व आहे. मध्ययुगातही तोच पाणीपुरवठ्याचा मुख्य भाग होता. अशा खोदलेल्या विहिरींची शासकी दफ्तरी आपल्या नावे नोंद केली जाई. अनेक विहिरींमध्ये अनेक शेतकरी भागीदार अस दिवसांनुसार (वारांच्याप्रमाणे) पाणी वापर प्रत्येकजण करीत असे. कागदपत्राला त्याच्य प्रमाणित हिश्श्याची नोंद असे.

मोटेशिवाय विहिरीतून पाणी काढण्यासाठी घटी, यंत्र, पोहरे यांचा वापर केला जाई. लाकडं किंवा लोखंडी रहाटाच्या पद्धतीने पाणी काढले जाई पण मोटेचा वापर मोठ्या प्रमाणावर असे.

**३. पाण्याचा साठा करणे :** गावालगत तळे खोदणे, नदीनाले अडवून पाण्याचा तलाव तयार करणे आणि अशा साठवण केलेल्या पाण्याचा वापर केला जाई. असा साठा केल्याने विहिरींना कायम पाणी राहत असे. आजचे मोठे तलाव, धरणे, पाझर तलाव यांच्याशी निगडि असाच हा पाणीपुरवठ्याचा एक प्रकार आहे.

शिवाजी महाराजांनी आपल्या राजधानीवर राजगड व नंतर रायगड येथे खडक फोडून अने तलाव खोदले होते आणि पाण्याचा भरपूर साठा केला होता. (राजगडावरील खडकातील तळ्यांचे



**राजगडावरील खडकातील तळे**

यासोबत चित्र दिले आहे.) तळ्यांचे हे अवशेष तर आपणाला बघायला मिळतातच पण शिवरायांनी राबविलेल्या पाणी व्यवस्थापनाच्या योजना आज आपणाला मार्गदर्शक असून त्या दृष्टीने महाराष्ट्रात 'शिवकालीन जलसंधारण योजना' शासकीय, वैयक्तिक व सामूहिक पातळीवर स्वीकारल्या व राबविल्या जात आहेत.



सरकारी खर्चाने धरणे बांधली जात, दुरुस्त केली जात. श्रमाबरोबर लोक आर्थिकदृष्ट्याही सहकार्य करत. उदा. पेशवे दफ्तरातील नोंदीनुसार यासाठी ५०% शासनाचा, ५०% जनतेचा खर्च केला जाई.

## पाटबंधाऱ्यासंबंधीचा महत्त्वपूर्ण निवाडा

१६७४ साली नदीला बांधावयाच्या एका बंधाऱ्यावरून उद्‌भवलेला दोन गावातील वाद, त्याचे स्वरूप व शेवटी त्यावर झालेला निर्णय अशी एक घटना पाण्याच्या व्यवस्थापनावर खूप महत्त्वाचा प्रकाश टाकणारी घटना वाटते. कारण त्या काळात लोक पाटबंधाऱ्याच्या कामात किती रस घेत होते याची कल्पना येते. डॉ. ए.आर.कुलकर्णी यांनी शिवकालीन महाराष्ट्र या पुस्तकात (पान ६०, ६१) ही घटना दिली आहे. महत्त्वाची घटना असल्याने तपशीलवार घेणे आवश्यक आहे. १६७४ सालच्या एका महजराकडून पाटबंधाऱ्याच्या कामात लोक किती रस घेत होते याची कल्पना येते. नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी परगण्यातील मोहाडी या खेडेगावातील लोकांनी आपल्या गावाशेजारून वाहणाऱ्या बाणगंगा नदीवर एक धरण बांधून आपल्या गावी काही जमीन बागायत करावी अशी उमेद बाळगून कामास प्रारंभ केला. परंतु शेजारच्या जाणोरी गावाच्या पाटलाने या त्यांच्या कामाला हरकत घेतली. त्याचे म्हणणे असे की, नदीवर येथे बांध घातले तर आपल्या गावच्या बांधास पाणी कमी होईल तरी हा बांध बांधू नये. बाणगंगा नदी मोहाडीच्या हद्दीतून जात नव्हती. तेथील शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टाने काही विहिरी खणल्या होत्या.परंतु पावसाचे प्रमाण कमी असल्याने त्या विहिरीतून वर्षभर पाणीपुरवठा होत नसे. त्यामुळे जिरायत जमिनीत पावसाच्या कृपेमुळे जे पिकेल त्यावरच त्यांना गुजराण करावी लागत असे. त्यामुळे तेथील रयतेची फार खराबी झाली होती. बाणगंगा नदीला मुबलक पाणी असून ठिकठिकाणी त्यावर बांध घालून त्या पाण्याचा उपयोग करून घेता येईल असे मोहाडीकरांना वाटे. बाणगंगेचे पाणी मिळाल्याखेरीज त्या गावचा उद्धार होणार नव्हता. त्यांचे म्हणणे होते की, नदी ही निसर्गाची देणगी असून त्यावर एकाच गावाचा अधिकार असू नये. हा तंटा एका मजलशीपुढे ठेवण्यात आला. त्यामध्ये नाशिक, दिंडोरी व वणी या तिन्ही परगण्यांचे मुत्सद्दी व जमीनदार होते. त्यांनी २ दिवस मोहाडीस मुक्काम करून सर्व पाहणी केली व निर्णय दिला की या जागी धरण बांधल्यास बरीच जमीन पाण्याखाली येईल तेव्हा धरण बांधण्यास मनाई करू नये. मोहाडीच्या मुकादमास तसा आदेश दिला व या कामी कोणी अडथळा करू नये. या निवाड्यामुळे मोहाडीच्या रयतेला बाणगंगेच्या पाण्याचा वापर करता येऊ लागला. अधिक जमीन पाण्याखाली आली व शेवटी सरकारचाच फायदा झाला. शिवाजी महाराजांचे पाटबंधारे, धरणे, कालवे अशा पाणीपुरवठ्याच्या योजनांकडे बारकाईने लक्ष असे. लोकांकडून ही कामे ते करून घेत असत. शिवापूर येथे नदीला बंधारा घालण्यासाठी महाराजांनी आज्ञा केली. या कामी यश पाटील यांनी महत्त्वाची भूमिका बजावली म्हणून महाराजांनी त्याला पाटीलकी देऊन गौरव केला.

...शाही राजवटीत शेतीला पाणीपुरवठ्यासाठी विहिरीप्रमाणे तलावांचा उपयोग केला

जाई. शेतकरी सामुदायिकपणे तलाव बांधत. खानदेश, विरार येथे बादशहानी तलाव बांधले. शहाजहान बादशहाने यमुना नदीवर दिल्लीपर्यंत १५० मैल लांबीचा कालवा (नहर-ए-बैहिश्त) बांधला. 'सोशिओ इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ मुघल इंडिया' नीलम चौधरी (पान नं. १..)

सम्राट अकबराची कारकीर्द सर्वार्थाने महत्त्वपूर्ण मानली जाते. पण त्याच्या काळात शेतीला पाणीपुरवठा करणाऱ्या विशेष अशा काही सिंचन योजना राबविल्याचे दिसत नाही. ए.एल.श्रीवास्तव लिहितात – 'Artificial irrigation however was absent in the days of Akbar - 'A short history of Akbar the Great' by A.L.Shrivastava (पान नं. १३८).

परंतु मुघलशाहीत सत्ताधीश बादशहा पाटबंधारे, कालवे, तलाव बांधण्याची कामे करून घेत असत. त्यावर देखरेखीसाठी दरोगा नावाचा शासकीय अधिकारी असे. या योजना कार्यान्वित राहतील ते पाहण्याची जबाबदारी त्याची असे. अशा पाणीपुरवठ्यासाठी स्वतंत्र कर शेतकऱ्यांकडून घेतला जात नसे. पण त्यांनी अशा योजनांवर लक्ष ठेवावे अशी अपेक्षा होती असे लिहिताना श्री.आय.एच.कुरेशी म्हणतात –

'The state undertook the construction of irrigation cannals and reservoirs. Irrigation works were put in charge of local officers called daroghas of cannals who were entrusted to keep them in good repairs. The state does not seem to have demanded any extra amount as water rate, because no such demand finds mentioned in contemporary records. The government was content with sharing the increased yield with the cultivator who, however was expected to help the state with his work in maintenance of the cannals'

The administration of the Mughal Empire by I.H.Qurashi, pp. 175-176

## कृषी तंत्रज्ञान व पीक पद्धती (Agricultural Technologies)

या घटकामध्ये आपल्याला मध्ययुगीन काळात शेती व्यवसाय कसा केला जात होता? शेतकरी त्यासाठी कोणती साधने म्हणजे प्रामुख्याने अवजारे वापरीत असे? बी–बियाणे कसे उपलब्ध होई? शेतीला खते कोणती व कशी दिली जात? मनुष्यबळ शेती व्यवसायासाठी किती उपलब्ध होते? शेती व्यवसायासाठी प्रामुख्याने बैलांचा उपयोग केला जाई तो कसा? या सर्व खर्चीक बाबींसाठी शासनाची शेतकऱ्यांना आर्थिक मदत, सहानुभूती होती काय? या सर्व घटनांचा अभ्यास करावयाचा आहे. हाच कृषी तंत्रज्ञानाचा अभ्यास होय.

### शेतकऱ्यांच्या गरजा

मध्ययुगात शेती व्यवसाय हा पारंपरिक पद्धतीनेच केला जात होता. त्यामध्ये फार मोठे तांत्रिक बदल किंवा सुधारणा नव्हत्या. शेती ही प्रामुख्याने जिरायती किंवा कोरडवाहू होती. त्यामुळे त्यांच्या गरजा पूर्वीसारख्याच होत्या. मध्ययुगात मुस्लीम सत्ताधीश साम्राज्यविस्ताराचे धोरण सतत राबवत, त्यामुळे युद्धजन्य परिस्थिती असे व त्याची झळ शेतकऱ्यांना फार मोठ्या प्रमाणावर बसत असे. अशा परिस्थितीतील त्यांच्या गरजांचा विचार करावयाचा आहे.



**१. मनुष्यबळ :** शेती व्यवसाय हा मनुष्यबळाने केला जाई. यांत्रिकीकरण नव्हते. शेतकऱ्यांपुढे मनुष्यबळाचा प्रश्न उभा असे, त्याला अनेक कारणे होती. सतत युद्धजन्य वातावरण आणि तरुणांना लष्कराची असणारी ओढ त्यामुळे ते सैन्यात असत. याशिवाय दुष्काळ, रोगराई या नैसर्गिक आपत्तीत होणारी प्रचंड जीवितहानी इ. कारणांमुळे शेती व्यवसायाला मनुष्यबळ कमी पडत असे.

इतिहासकार मोरलँडच्या मते, साधारणपणे लोकसंख्येचा $^{1}/_{30}$ भाग सैन्यांत गुंतलेला असे. मराठी सत्तेबाबत सभासद बखरीतील आशय असा घेता येईल की, स्वराज्याच्या कार्यात गुंतलेल्या तरुण मावळ्यांचे प्रमाण उत्तर हिंदुस्थानातील लोकसंख्या व सैन्य यांच्या प्रमाणापेक्षा जास्त असावे. शिवकाळात पडलेल्या भयंकर दुष्काळामुळे महाराष्ट्रातील $^{4}/_{5}$ लोक मरण पावले असे समर्थ रामदास लिहितात. यावरून त्याची भीषणता जाणवते. तेव्हा अशा कारणांमुळे मनुष्यबळ शेती व्यवसायाला कमी पडत असे. याचा परिणाम शेतीची कामे वेळेत झाली नाहीत तर त्याचा उत्पादनावर विपरीत परिणाम होत असे.

**२. बैलजोडी :** शेती करण्यासाठी बैलजोडीची फार गरज असे. यांत्रिकीकरणाने अलीकडे त्याची निकड कमी वाटत असली तरी मध्ययुगात बैलाशिवाय शेती शक्य नव्हती. जनावरे म्हणजे शेतकऱ्याचे पशुधन होय. पण युद्धजन्य परिस्थितीत शत्रू शेतकऱ्याची ही जनावरे पळवून नेत असत. त्यांची दौलतच जणू लुटली जाई. तसे झाले की शेती व्यवसायच मोडकळीस येत असे. यासाठी शासनाचे लक्ष असणे आवश्यक असे. शेतकऱ्यांना बैलजोडी विकत घेण्यास आर्थिक मदत करावी, ती रक्कम बिनव्याजी असावी आणि शेतकऱ्यांच्या सवडीनुसार ते पैसे परत घ्यावेत अशा सूचना देणारे शिवरायांचे पत्र आहे.

**३. शेतीची अवजारे :** शेतीची अवजारे म्हणजेच उपकरणे ही शेतकऱ्याची आणखी एक महत्त्वाची गरज आणि शेती व्यवसायाचे साधन होय. नांगर, कुळव, तिफण, कोळपे, बैलगाडी इ. महत्त्वाची अवजारे होती. ही अवजारे गावातील सुतार, लोहार या कारागिरांकडून बनवली जात. दुरुस्त केली जात. लाकूड व इतर सामान देऊन शेतकरी त्यांच्याकडून उपकरणे बनवून घेई. गावची आर्थिक रचना शेती व्यवसायाला अनुकूल अशी होती. प्रसंगी अवजारे खरेदीसाठी सरकारकडून कर्ज मिळत असे.

**४. बी–बियाणे :** आजच्याप्रमाणे त्या काळात बाजारात संकरित स्वरूपाची बी–बियाणे उपलब्ध नव्हती. शेतकरी स्वतःच त्याची तरतूद करीत असे. प्रत्येक वर्षी आपल्या शेतात तयार होणारे उत्तम वाटणारे धान्य गरजेएवढे तो वेगळे ठेवत असे. वर्षभर ते काळजीपूर्वक जपत असे. तेच पुढील वर्षाचे बी मागे असे. पण काही वेळा ते सुद्धा पोटासाठी वापरले जाई. मग बियाणांचा प्रश्न येई. अशा वेळी सरकारकडून दामदुपटीच्या बोलीने त्याला बियाणे आणावे लागे. अनेक वेळा शेतकरी एकमेकांना दीडीच्या दराने बियाणे देत असत. बियाणे घेण्यास गरजूंना आर्थिक मदत करावी अशा शिवरायांनी सूचना दिल्या होत्या.

**५. खते :** शेतीला खतांची आवश्यकता फार असते. खतांशिवाय भरपूर उत्पादन शक्य

नसते. शेतकरी प्रामुख्याने शेणखतांचाच वापर करीत असे. त्यासाठी जनावरे पाळत असे. त्यांच्या मलमूत्रापासून खत तयार होई. शेतीसाठी बैलांची आवश्यकता सांगितलीच आहे. बैलाशिवाय, गाय, म्हैस, शेळी-मेंढी, गाढव, घोडा अशी जनावरे असत. ते त्यांचे पशुधन होय. शेतीला शेणखत अत्यंत उपयुक्त व आवश्यक आहे हे आपण आजही मान्य करतो. अबुल फजल लिहितो, मुघल काळात शेतकऱ्यांना चार बैल, दोन गाई, एक म्हैस पाळण्यास परवानगी असून त्यावर कर नव्हता.

**६. घात-वाफ साधणे :** शेती बी-बियाणे पेरणीसाठी पावसाचे झालेले योग्य प्रमाण साधणे व त्याचा अचूक लाभ घेत तातडीने पेरणीची कामे उरकणे हे एक शेतकऱ्यांचे व्यवसायातील फार महत्त्वाचे तंत्र होते. त्याला घात-वाफ साधणे म्हणतात. ती योग्य साधल्यास पीक चांगले वाफू शकते. त्यासाठी कितीही अडचणी आल्या तरी शेतकरी घात साधून पेरणी करतो. तुकाराम महाराज म्हणतात –

मढे झाकुनिया करीतो पेरणी।<br>
कुणबीयाचे वाणी लवलाहे ।।

घरात एखाद्याचा मृत्यू झाला असला तरी त्याच्या उत्तरक्रियेचे काम बाजूला ठेवून शेतकरी लावणीची घात साधत असे. एक प्रकारे शेती व्यवसायाचे हे महत्त्वाचे तंत्र होते.

**७. अर्थसाहाय्य :** शेतकऱ्याची न बसलेली आर्थिक घडी, त्याचा कर्जबाजारीपणा ही समस्या मध्ययुगात होती व आजही आहे. शेती व्यवसाय हा कालांतराने फलदायी ठरणारा आहे. अर्थात, या मोठ्या कालखंडात त्याला अनेक नैसर्गिक व मानवनिर्मित अडचणीतून जावे लागते. शेती व्यवसायासाठी व स्वतःच्या उदरनिर्वाहासाठी शेतकऱ्याला हवा असणारा पैसा त्याला सावकाराकडून घ्यावा लागत असे. त्याचे व्याजाचे दर जबरदस्त असत. दरमहा शेकडा पाच म्हणजे प्रसंगी ६०% किंवा त्यापेक्षाही अधिक दराने व्याज घेत असत. कित्येक वर्षे सावकाराकडून शेतकऱ्यांची खूप पिळवणूक होत राहिली. त्याविरुद्ध निर्माण झालेल्या असंतोषातून पुढे १९ व्या शतकात दक्षिणेत शेतकऱ्यांनी केलेले उठाव इतिहासात प्रसिद्ध आहेत. तेव्हा शेतकऱ्यांची आर्थिक अडचण मोठी होती. ती दूर व्हावी यासाठी शासनाच्या सहानुभूतीच्या धोरणाची गरज असते.

**शेती व्यवसायाची पद्धत :** मध्ययुगात शेती व्यवसायाची पद्धत पारंपरिक स्वरूपाची होती. येथे फक्त अन्नधान्याचे उत्पादन करणाऱ्या कोरडवाहू किंवा जिरायत शेतीपद्धतीची थोडक्यात माहिती देत आहोत. त्यानुसार उन्हाळ्याच्या प्रारंभी जमिनीची नांगरण केली जाई. नंतर वळवाचा पाऊस झाल्यावर अंतर मशागतीसाठी कुळवणी, जमिनीची साफसफाई, खते देऊन पेरणीसाठी जमीन तयार केली जाई. मोसमी पाऊस सुरू झाला की योग्य वेळ साधून पेरणी केली जाई. पीक थोडे मोठे झाल्यावर कोळपणी करून तण काढले जाते. त्यानंतर योग्य वेळी पीक तयार झाले की ते काढले जाते. मळणी करून धान्य घरी आणले जाते. वर्षभराची धान्याची पुंजी केली जाते. शेतकऱ्याचा हा नित्यक्रम असे. यापैकी अनेक कामे सहकार



पद्धतीने काही शेतकरी एकत्र येऊन करत असत. त्यासाठी मनुष्यबळ व बैलांचा एकत्र उपयोग केला जात असे.

## (ब) महसूल व्यवस्था, ग्रामीण समाजरचना

### महसूल व्यवस्था (Revenue System)

महसूल हे कोणत्याही सत्तेचे उत्पन्नाचे प्रमुख साधन असते. मुघल साम्राज्य तर विशाल होते. भारतातील तत्पूर्वीच्या राज्यकर्त्यांनी आपापल्या ताब्यातील जमिनीचे महसूल आपापल्या पद्धतीने ठरविले होते. त्यामुळे अनेक महसूल पद्धती अस्तित्वात होत्या. अनेक कारणांमुळे मुघलांना विविध पद्धती चालू ठेवाव्या लागल्या.

### प्रचलित काही महसूल पद्धती

मुघलांपूर्वी सुलतानशाहीत अल्लाउद्दीन खिलजीने सर्वप्रथम महसूल पद्धतीत सुधारणा केल्या. पण सुलतानांचे धोरण संपत्ती मिळविणारे होते. मुघल काळात शेरशहाने मात्र शेतकऱ्यावर अन्याय होऊ नये, योग्य शेतसारा पद्धती असावी या दृष्टीने भरीव कामगिरी केली. या पद्धतीला शास्त्रीय बैठक देण्याचे कार्य सम्राट अकबराने व १७ व्या शतकात दक्षिणेत शिवाजी महाराजांनी केले. पण तत्पूर्वी भारतात खालीलप्रमाणे काही महसूल पद्धती अस्तित्वात होत्या. अर्थात, त्याचा येथे अगदी थोडक्यात विचार करावयाचा आहे.

**१. घल्ला-बक्षी पद्धत :** ही सर्वांत सोपी पद्धत होती. कोणत्याही सत्तेला प्रारंभिक काळात राबविणे सोईचे होते. यास बटाई पद्धती म्हणत. याचे तीन प्रकार होते. (अ) रास बटाई (ब) खेत बटाई (क) लंक बटाई. या पद्धतीत पीक उभे असल्यापासून ते खळ्यात मळणी चालू असेपर्यंत उत्पन्नाची पाहणी करून शेतसारा ठरविला जात असे.

**२. कानकूट पद्धत :** या पद्धतीला थोडा शास्त्रीय आधार होता. जमिनीची मोजणी केली जाई. निवडक जमिनीतील उत्पन्नाचा अंदाज घेऊन शेतकऱ्याचा हिस्सा बाजूला करून उरलेला महसूल घेतला जाई. त्याचे मूल्य ठरविले जाई व पैशात घेतला जाई.

**३. नसक पद्धत :** सुमारे दहा वर्षांत दिलेल्या जमीन महसुलाची सरासरी काढून सरकारी हिस्सा ठरविला जाई. जमिनीच्या मोजमापाची गरज नसे. मोरलँडच्या मते, ही संक्षिप्त रीतीने केलेली आकारणी होती. इरफान हबीब यांच्या मते, पूर्वी निश्चित केलेली कुठलीतरी आकारणी स्वीकारून प्रत्यक्ष जमिनीची मोजमाप करण्याची केलेली टाळाटाळ होय.

**४. पेरणी क्षमता व नांगर पद्धत :** काश्मीरमध्ये पेरणी क्षमता पद्धत होती. शेतकरी जमीन कसण्यासाठी वापरत असलेल्या नांगरांच्या संख्येवरून नांगर पद्धत ठरविलेली असे.

### प्रचलित महसूल पद्धतीमधील दोष

१. दरवर्षी पीक पाहून त्याच्या किमतीवर महसूल आकारणी करण्याने महसुलाचा निश्चितसा अंदाज करता येत नव्हता.

२. जहागीरदाराच्या ताब्यात मोठ्या प्रमाणावर जमिनी होत्या.

३. जहागीरदा[illegible]णापेक्षा अधिक महसूल वसूल करीत त्यामुळे त्यांच्याकडे प्रचंड पैसा होता.



Scanned with CamScanner

४. महसूलदर शेतकऱ्यावर अन्याय करणारे होते.

५. महसूल वसुली जाचक असून जहागीरदार शेतकऱ्यावर जुलूम करीत.

६. जमीन मोजणीची पद्धत चुकीची होती.

## सम्राट अकबराची जमीन महसूल व्यवस्था

सम्राट अकबराची राजवट जनहिताची व सहिष्णू होती. शेतकऱ्यावर अन्याय होऊ नये यासाठी त्याने विशेष परिश्रम घेऊन महसूल पद्धतीचे धोरण राबविले. त्यांची महसूल पद्धत आठ प्रांतांत लागू होती. अकबराच्या महसूल व्यवस्थेचे टप्पे पुढीलप्रमाणे होते -

१. जमिनीची मोजणी करणे.

२. जमिनीचे वर्गीकरण करणे.

३. जमिनीच्या मालकीहक्काची कागदपत्रे शेतकऱ्यांना देणे.

४. शेतसारा निश्चित करणे.

५. शेतसारा वसूल करणे.

**१. जमिनीची मोजणी करणे :** शेतसारा शास्त्रीय पद्धतीवर आधारित असण्यासाठी जमिनीची मोजणी करणे ही प्राथमिक आवश्यक गोष्ट होय. अकबराने जमिनीची मोजणी करण्यासाठी जुना दोष काढून टाकून गज पद्धतीने मोजणी केली. ३३ इंच लांबीचा एक गज व ३६०० चौ. गजाचा एक बिघा याप्रमाणे मोजणी केली. ते काम करणाऱ्यांना शासनाकडून वेतन दिले. या कामी लाचलुचपत होऊ नये यासाठी कठोर धोरण राबविले.

**२. जमिनीची वर्गवारी :** मोजणीनंतर जमिनीची वर्गवारी ४ विभागांत केली.

**(अ) पोलाज** ( उत्कृष्ट जमीन) - वर्षातून एक किंवा दोनदा पिके घेतली जात.

**(ब) परौती** (मध्यम जमीन) - या जमिनी एक वर्ष आड कसल्या जात.

**(क) चाचर** (निकृष्ट जमीन) - ही जमीन ३/४ वर्षे पडीक ठेवून नंतर कसत.

**(ड) बंजर** (खडकाळ जमीन) - पाच वर्षे किंवा अधिक काळ पडीक असणारी जमीन.

अकबरापूर्वी पोलाज व परौती या दोन प्रकारांतच जमिनीचे वर्गीकरण केलेले होते व त्याचे प्रत्येकी तीन उपप्रकार होते. उत्पन्नाची सरासरी काढून त्याचा तिसरा हिस्सा शेतसारा असे. वेगवेगळ्या पिकांना वेगवेगळे दर होते. ऐन-ए-अकबरीनुसार शेरशहाच्या काळात महसुलाची झब्त पद्धत सुरू होती. पण अकबराने त्याला पूर्णत्व व शास्त्रीय रूप दिले ही त्याची विशेष कामगिरी होय.

## झब्त पद्धत

शेरशहाचा महसूल पद्धत वारसा अकबराकडे आला. त्यामध्ये त्याने क्रमाक्रमाने सुधारणा केल्या व १५८० मध्ये त्याने स्वतःच्या मार्गाने ती पद्धत पूर्णत्वास नेली. त्यासाठी अकबराने १५६० पासून सुमारे २० वर्षांत सहा प्रयोग केले. अकबराची जमीन महसूल पद्धत ही **'राजा तोरडमलचा बंदोबस्त'** या नावाने ओळखली जाते. तोरडमलची हुशारी पाहून अकबराने त्याला १५७३ साली गुजरात प्रांताचा दिवाण नेमले. त्याने जमीन महसूल क्षेत्रात अनेक सुधारणा केल्या.



त्याच्या या सुधारणा म्हणजे अकबराने केलेले प्रयोग होत. तोरडमलच्या या सुधारणांची व त्यामुळे महसुलात झालेली वाढ याची ऐन-ए-अकबरीत सविस्तर माहिती दिली आहे.

तोरडमलने शेतजमिनीची प्रतवारीनुसार मोजणी व वर्गीकरण केले. शेतकऱ्यांना जमिनीच्या मालकीची कागदपत्रे दिली. मागील १० वर्षांत महसुलाची एकंदर रक्कम विचारात घेऊन व त्याची सरासरी काढून तिचा १/३ भाग सरकारी महसूल म्हणून निश्चित केला. अधिकारी वर्ग खेड्यात जाऊन पिकांची पाहणी करत. महसुलाच्या तीन पद्धती असल्या तरी झब्त पद्धत अधिक रूढ होती. महसूल जमिनीची प्रतवारी, सरासरी उत्पन्न यांवर आधारित असे. पोलाज व परौती जमिनीतील सरकारी हिस्सा उत्पन्नाच्या १/३ होता. चाचर जमिनीतील शेतसारा पहिल्या वर्षी १/१५ व क्रमाने वाढत जाऊन पाचव्या वर्षी १/३ तर बंजर जमिनीतील शेतसारा पहिल्या वर्षी १/२६ व क्रमाने वाढत जाऊन पाचव्या वर्षी १/३ होत असे. ही अकबराची महसुलाची झब्त पद्धत होय.

**'झब्त'** या शब्दाचा अर्थ **'जमिनीचे मोजमाप'** असा आहे. या पद्धतीची दोन वैशिष्ट्ये होती.(१) जमिनीचे वार्षिक किंवा प्रासंगिक मोजमाप. (२) आकारणीच्या दराचे निश्चित स्वरूप. मुघल साम्राज्यातील जमिनीची विभागणी खालसा जमिनी व जहागिरीच्या जमिनी अशा दोन भागांत केली जाते. खालसा जमिनी प्रत्यक्ष सरकारी व्यवस्थेखाली असत. दोन्ही प्रकारच्या जमिनीचा महसूल सरकारी अधिकाऱ्यामार्फत निश्चित केला जाई. शेतसारा खरीप पिकानंतर व रब्बी पिकानंतर असा दोन वेळा वसूल केला जाई.

## शेतसारा वसुली अधिकारी

१. खेडेगाव : पाटील, कुलकर्णी

२. परगाणा : अमीन / मुनशीप

३. जिल्हा : बितिकची

४. प्रांत : दिवाण

५. केंद्र : वजीर

## सम्राट अकबराच्या जमीन महसूल पद्धतीचे मूल्यमापन

अकबर एक थोर प्रशासक होता. शेतकऱ्यावर अन्याय होणार नाही याची त्याने काळजी घेतली. त्याचबरोबर राज्याचे उत्पन्न वाढले जावे याकडे पण लक्ष दिले, त्यासाठी त्याने राबविलेल्या महसूल व्यवस्थेचे अनेक इतिहासकारांनी मूल्यमापन केले आहे. गुण-दोष दाखवले आहेत.

### गुण (Merits)

१. मध्यस्थ दूर केल्याने त्यांच्याकडून शेतकऱ्यावर होणारा जुलूम थांबला आणि शेतकरी व शासन यांचे प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित झाले.

२. शेतसाऱ्यातील शासकीय अनिश्चितता संपली.

३. नैसर्गिक आपत्ती, युद्धजन्य परिस्थिती, राजपुत्रांचे शिकारीचे छंद इ. कारणाने शेतकऱ्याचे नुकसान झाल्यास नुकसानभरपाईची तरतूद केली.

Scanned with CamScanner

४. कर्जाची सोय केली. परतफेड सुलभ केली. त्यामुळे शेती उत्पादन वाढले.

५. शासनाचे उत्पन्न वाढले.

६. जमिनीची मोजणी अधिक निर्दोष होऊ लागली.

अकबराच्या महसूल सुधारणाबाबत इतिहासकार **व्ही. स्मिथ** म्हणतो, "अकबराची महसूल पद्धत कौतुकास्पद होती पण विशाल साम्राज्य आणि दूरच्या प्रांतातील अधिकाऱ्यांची स्वतंत्रवृत्ती पाहता ही पद्धत कितपत यशस्वी झाली हे सांगता येत नाही."

**डॉ. ईश्वरीप्रसादच्या** मते, "या व्यवस्थेमुळे शेतकऱ्यास जमिनीचा मालक म्हणून मान्यता मिळाली. ते आपले उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न करू लागले. त्यामुळे देशाचे उत्पन्न वाढले."

इतिहासकार **जी. एस. सरदेसाई**, मुसलमानी रियासतीत लिहितात की, "जमीन महसूलसंबंधाने पूर्वी हिंदू व मुसलमान शेतकऱ्यांत भेदभाव ठरविलेला होता. तो अकबराने काढून टाकला."

**दोष (Demerits)**

१. महसूल सुधारणांची अंमलबजावणी अधिकाऱ्याकडून प्रामाणिकपणे झाली असेल काय याबद्दल इतिहासकारांनी शंका व्यक्त केली आहे. ते अधिकारी भ्रष्ट होते.

२. शेतसारा प्रमाणावर युरोपीय इतिहासकार असंतोष व्यक्त करतात.

३. महसूल पद्धतीमध्ये ग्राम सुधारणांची तरतूद नव्हती.

शेवटी इतिहासकार **लेनपूल** म्हणतो, "अकबराच्या महसूल व्यवस्थेमुळे मुघल साम्राज्याला दीर्घकाळ पैसा मिळाला. बाबर व हुमायून यांच्या काळात रिकामा झालेला खजिना भरला. त्यामुळे विलासी जहांगिरला साम्राज्य टिकविता आले. शहाजहानला वैभवशाली बनता आले व धर्मवेड्या औरंगजेबाला मुघल साम्राज्याचा विस्तार करता आला."

अकबराने घालून दिलेली महसूल पद्धत पुढे औरंगजेबाअखेर कायम होती. शहाजहानने शेतीविषयक सुधारणा केल्या व दुष्काळात शेतकऱ्यांना मदत केली. महसूल उत्पन्न अकबराच्या काळात १३ कोटी २१ लक्ष ३६ हजार ८३१ रु, शहाजहानच्या काळात ३६ कोटी होते असे अबुल फजल लिहितो. तर मनूचीच्या मते, औरंगजेबाच्या काळात ३८ कोटी ७२ लक्ष ५९ हजार रु. होते.

जी.एस. सरदेसाईंच्या मते, १५९६ साली वसूल ९ कोटी रु. होता. तो हळूहळू १४ कोटीवर गेला आणि जास्तीतजास्त १७ १/२ कोटीच्या वर कधीच गेला नाही.

According to **I.H. Qureshi** " the total revenue of the empire was estimated to be 5131353000 dams under Akbar, 8800000000 dams under shahjahan and 13599963822 dams under Alamgir. (there was 40 dams to a rupee)



VIVEKA... LIBRARY Acc. No. Date 48959 KOLHAPUR

## ग्रामीण समाजरचना

मध्ययुगात भारतीय समाज प्रामुख्याने ग्रामीण म्हणजे खेडेगावात राहणारा होता. हा समाज शेती व्यवसायाशी निगडित होता. प्राचीन काळापासून ही समाजरचना होती. या उपप्रकरणामध्ये मुघल साम्राज्यातील म्हणजे उत्तरेतील ग्रामीण समाजरचना आणि दक्षिणेतील समाजरचना की ज्यामध्ये मुख्यत्वे महाराष्ट्रातील ग्रामीण समाजरचना आपण अभ्यासणार आहोत.

## मुघल राज्यातील समाजरचना

अनेक परकीय प्रवाशांचे वृत्तांत आणि इरफान हबीबसारख्या इतिहासकारांच्या संदर्भाने के. एन. चिटणीस यांनी मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था भाग दुसरा या ग्रंथात भारतातील समाजरचना सांगितली आहे. ते त्याला ग्रामसंस्था असे म्हणतात. यामध्ये त्यांनी मुघल राज्यातील आणि दक्षिणेतील ग्रामसंस्था असे विभाजन केले आहे.

मुघल काळात ग्रामीण समाजातील लोकांचे सहा वर्ग होते.

१. जमीनदार, सावकार, व्यापारी

२. श्रीमंत शेतकऱ्यांचा हा वर्ग होता.

३. सामान्य शेतकऱ्यांचा हा वर्ग असून त्यांची स्वत:ची जमीन असे.

४. कनिष्ठ व गरीब शेतकरी वर्ग की ज्यांना शेतीची अवजारे, बी-बियाणे, जनावरे घेण्यासाठी कर्ज घ्यावे लागत असे.

५. स्वत:च्या मालकीची जमीन नसून दुसऱ्याच्या जमिनीवर राबणारा पण तरीही स्वतंत्र असणारा शेतकरी वर्ग.

६. भूमिहीन मजुरांचा शेवटचा वर्ग होता. हे लोक शेतावर राबत असत. शिवाय मजुरी, हमाली, झाडूवाले अशी कामेही करत असत. याप्रमाणे आर्थिक स्थितीवर आधारलेले हे समाजजीवन सर्वसाधारण किंवा स्थूलमानाने मांडता येईल. ग्रामीण समाजरचनेमध्ये खेडे हे स्वयंपूर्ण होते.

## मध्ययुगीन महाराष्ट्रातील ग्रामीण समाजरचना

प्राचीन काळापासून या देशात सामाजिक व आर्थिक रचनेचा केंद्रबिंदू खेडेगाव होते. शेती हा लोकांच्या जीवनाचा प्रमुख मार्ग होता. मध्ययुगात देखील खेडे हा महत्त्वाचा घटक होता. तेव्हा ग्रामीण समाजरचना अभ्यासावयाची म्हणजे या खेड्याच्या निर्मितीपासून ते तेथील लोकांची सामाजिक, आर्थिक स्थितीचा विचार करणे होय.

**खेडेगाव :** खेड्यांची निर्मिती कशी झाली हे निश्चित सांगणे कठीण असले तरी धाडसी लोकांनी जंगले तोडून साफसफाई केली. ती जमीन लागवडी योग्य बनवून वसाहतीस सुरुवात केली व त्यातून खेडे उदयास आले. त्यासाठी सरकारी प्रोत्साहन व मदत मिळत होती. जमिनीचे दोन विभाग होते. वसाहतीयोग्य जमिनीला पांढरी व लागवडीयोग्य जमिनीला काळी किंवा

काळी आई म्हणत. पांढरीमध्ये केलेल्या वसाहतीला खेडे, ग्राम, देहे, मौजा अशी अनेक नावे होती. खेड्याच्या उपविभागाला मजरा, वाडी, पाडी, खारी इ. नावे होती. खेड्याचा अधिक विस्तार झाल्यास त्याचे नाव न बदलता 'बुद्रुक' व 'खुर्द ' असा उल्लेख केला जाई. आजही याप्रमाणे गावांचा उल्लेख अनेक ठिकाणी आपणाला पाहावयास मिळतो. ज्या खेडेगावात आठवड्याचा बाजार भरत असे त्याचा 'कसबा' असा उल्लेख करत. ते कसबी लोक म्हणजे कारागीर, हरहुन्नरी अशांचे राहण्याचे ठिकाण म्हणूनही कसबा म्हणत असत. त्याचा 'पेठ' असाही उल्लेख करत. समुद्रकिनारी बंदराच्या ठिकाणच्या अशा गावाला 'मिरे' म्हणत असत.

**खेडेगावचे रहिवासी :** शेती हा खेडेगावचा प्रमुख व्यवसाय होता. ज्यांना गावात जमीन असे ते लोक त्या गावचे प्रमुख रहिवासी होते. त्यामध्ये परंपरेने असलेले अधिकारी (वतनदार) जमिनीचे मालक (मिरासदार) आणि ग्रामसेवक यांचा समावेश असे. गावात सामान्यतः चार सत्ता रूढ होत्या.

**(अ) दिवाणसत्ता :** यामध्ये हवालदार, कारकून असे प्रत्यक्ष राज्याचे नोकर लोक असत. पण ही सत्ता अशाश्वत होती.

**(ब) गोतसत्ता :** खेडेगावातील म्हणजेच एकूण ग्रामीण समाजरचनेतील हा अतिशय महत्त्वाचा घटक होता. यामध्ये गावातील वतनदार अधिकारी, मिरासदार व बलुतेदारांचा समावेश असे. ही सत्ता शाश्वत व समर्थ स्वरूपाची होती.

**(क) धर्मसत्ता :** याला ज्ञातीसत्ताही म्हणत, ही स्वतंत्र होती.

**(ड) व्यापारी सत्ता :** पेठेचे ते परंपरागत अधिकारी होते. स्वतंत्र सत्ता होती.

## वतनदार अधिकारी

ग्रामीण समाजरचनेत वतनदार अधिकारी फार महत्त्वाचे असून ती पदे वंशपरंपरागत मिळत असत. 'शिवकालीन महाराष्ट्र' या ग्रंथात डॉ. ए. आर. कुलकर्णी यांनी या समाजरचनेची तपशीलवार माहिती दिली आहे. त्यानुसार या वतनदार अधिकारी मंडळींचा समाजातील त्यांचे स्थान, अधिकार, कर्तव्ये यांचा विचार करून पाटील, कुलकर्णी, चौगुला, शेटे-महाजन तसेच परगणातील देशमुख आणि देशपांडे, मिरासदार व उपरा आणि शेवटी बलुतेदार या क्रमाने आपण पुढीलप्रमाणे विचार करणार आहोत.

**पाटील :** हा गावचा मुख्य सरकारी वतनदार होता. तो वंशपरंपरागत वतनदार होता. गावातील पडीक जमीन लागवडीसाठी आणण्याचे काम करीत असल्याने वसाहतीचे कार्य करी तर गोतसभेचा अध्यक्ष या नात्याने तो न्यायनिवाडा व प्रशासकीय निर्णय घेत असे. त्याच्या संमतीनेच गावचा शेतसारा निश्चित केला जात असे. कुलकर्णीच्या मदतीने तो गावच्या वार्षिक उत्पन्नाचे अंदाजपत्रक तयार करीत असे. गावचा सारा वसूल करण्याची त्याची जबाबदारी असे. यासाठी त्याला सारामुक्त जमीन मिळत असे. वसूल झालेला सारा कचेरीत जमा करणे, दुष्काळ किंवा अन्य संकटसमयी महसुलात सवलत मागण्याचा हक्क पाटलाला असे. परचक्र किंवा दरोडेखोरापासून गावाचे रक्षण करणे, गावात शांतता राखणे ही कामे करत असे. पाटील



हा गावातील गोतसभेचा अध्यक्ष या नात्याने सभा बोलावित असे. न्यायनिवाडा करीत असे. त्याच्या सही शिक्क्यानेच निकाल अंतिम होई. चावडी हे त्याचे यासाठी ठिकाण असे. पाटील पद मराठ्याकडे असे. क्वचित अन्य जातीकडेही असे.

पाटलाला काही विशेष हक्क होते. या हक्कांना 'हकलाजिमा' असे म्हणत. ते परंपरेने मिळत. अर्थात हे हक्क कायदेशीर नसले तरी त्यामागे पाटलाचा मानपान आणि लोकांनी आदराने राखलेला त्याचा समाजातील श्रेष्ठ दर्जा होता. त्याचे हक्क असे होते की प्रत्येक सणावेळी पहिला मान पाटलाचा असे. त्याला प्रथम भेट द्यावी. बलुतेदार आपले पहिले उत्पादन पाटलाला भेट देई. शेतकरी काही धान्य पाटलाला देई. गावातून सरकारला जाणाऱ्या उत्पन्नाचा काही हिस्सा पाटलाला मिळे. तो हिस्सा सरकार ठरवित असे. सरकारी कराचा काही भाग त्याला मिळत असे. पाटलाशिवाय गावचे सारे काम अडून राहत असे. काही कारणामुळे एखाद्या गावात पाटील नसेल तर तेथे ती नेमणूक होईपर्यंत परगण्याचा अधिकारी देशमुख ते पाटीलकीचे काम पाहत असे.

**कुलकर्णी :** हा गावचा दुय्यम दर्जाचा अधिकारी व पाटलाचा साहाय्यक असे. त्याला गावकुलकर्णी म्हणत. गावचा सर्व हिशेब तो ठेवीत असे. त्यामुळे त्याला 'ग्रामलेखी' असेही म्हणत असत. प्रत्येक मिरासदाराकडे असणारी जमीन, शेतसारा, वसुली, थकबाकी व याप्रमाणे एकूण गावाचा हिशेब लिहिण्याचे काम तो करत असे. तो हिशेब त्याला सरकार दरबारी सादर करावा लागे. पाटलाच्या बरोबर राहून महसूलविषयक सर्व कामे तो करत असे. यामध्ये चूक किंवा कुचराई झाल्यास त्याला शिक्षा होत असे. काही वेळा त्याचे वतन काढून घेतले जाई. असे प्रसंग क्वचितच घडत. पडीक जमीन लागवडीखाली आणणे उत्पादन व महसूल वाढविण्याकडे लक्ष देत असे. हा कुलकर्णी काही वेळी जोशीपणाचेही काम करीत असे. कुलकर्णी संख्येने कमी असत. कारण लिहिणे, वाचणे, हिशेब ठेवण्याचे ज्ञान अल्प लोकांना असे. त्यामुळे अनेक गावांसाठी एक कुलकर्णी काम करीत असे. काही वेळा हिशेबातील लबाडीबद्दल कुलकर्णीला शिक्षा झाल्याची मराठी सत्तेत उदाहरणे आहेत. ज्या ठिकाणी कुलकर्णी नसे त्या ठिकाणी मुतालिक नावाचा अधिकारी नेमला जात असे. तो कुलकर्णीचा हस्तक म्हणून काम करीत असे.

कुलकर्णी हा पाटलाचा साहाय्यक असला तरी त्याच्या सल्ल्याप्रमाणे पाटील निर्णय घेत असे. काही ठिकाणी पाटील केवळ नामधारी व कुलकर्णीच गावचा सर्व कारभार पाहत असल्याची उदाहरणे आहेत. कुलकर्णी हे वतन वंशपरंपरागत बनले होते. कुलकर्णी वतनाबाबत काही वाद निर्माण झाल्यास तो गोतसभेपुढे येत असे. तेथे नवीन कुलकर्णी नेमला गेल्यास त्याला शासनाची मान्यता घ्यावी लागे. कोकणातील कुलकर्णी वतन काही भागांत वंशपरंपरागत नव्हते.

कुलकर्णीला पाटलाप्रमाणे अनेक हक्क (हकलाजिमे) होते. सनदेत त्यांचा उल्लेख असे. वस्तू किंवा रकमेच्या रूपाने त्याला मिळणारे मानधन पाटलापेक्षा कमी असे. कारण

Scanned with CamScanner

त्याचे स्थान दुय्यम होते. दफ्तर खर्चासाठी सरकारकडून त्याला रक्कम मिळे. त्याला 'सादिलवार' म्हणत. काही वेळा गावकरी पण ही रक्कम देत असत. बलुतेदारांकडून त्याला भेटवस्तू मिळत. उदा. चांभाराकडून पायपोस, शेतकऱ्याकडून हुंडी, गवत, खाजगी कामासाठी वेठबिगार इ. पण या हक्कांचे स्वरूप सर्वत्र सारखे नव्हते.

**चौगुला :** गावातील हा एक महत्त्वाचा वतनदार अधिकारी होता. तो बलुतेदार नव्हता. त्याला 'ग्रामणी' म्हणत. चार कुळे बाळगणारा तो चौगुला असा अर्थ आहे. चौगुला हा पाटलाला गावकीच्या कामात मदत करत असे. प्रामुख्याने सारा वसुलीच्या कामात त्याची फार मोठी मदत होत असे. पाटलाप्रमाणे त्याची निशाणी 'नांगर' होती. काही ठिकाणी 'काठी' ही सुद्धा त्याची निशाणी होती. याचा अर्थ, जमिनीच्या मोजमापात त्याची कामगिरी महत्त्वाची दिसते. गावचा वसूल सरकारी कचेरीत भरण्याचे काम तो करीत असे. गाव सोडून गेलेल्या शेतकऱ्यांना पुन्हा गावात परतण्यास प्रोत्साहन देत असे. गावातील धान्याची कोठारे, खाजगी लोकांची कोठारे यावर त्यांची देखरेख असे. गोतसभेत पाटलाच्या खालोखाल याचा दर्जा होता.

**शेटे-महाजन :** गावकीच्या कामातील हा एक स्वतंत्र महत्त्वाचा वतनदारांचा वर्ग होता.. गावच्या पेठेचे,ते परंपरागत अधिकारी होते. गावात पेठ वसविण्याचे काम हे अधिकारी करत असत. यासाठी शासनाकडून जमीन व गावाकडून काही हक्क मिळत. पेठेची जबाबदारी यांची असे. कुलकर्णी गावचा तसा महाजन पेठेचा हिशेब ठेवत असे. गोतसभेत भाग घेण्याचा त्यांना अधिकार होता. 'तराजू' ही त्याची निशाणी असून ते सावकारी पण करीत असत.

**देशमुख :** हा परगण्याचा वतनदार अधिकारी होता. अनेक खेड्यांचा मिळून परगणा होत असे. परगण्यातील सर्व पाटलांचा प्रमुख देशमुख असे. बहुतांश ठिकाणी हे पद मराठ्यांकडे असे. पाटलाच्या कामावर देखरेख ठेवणे, पडीक जमीन लागवडीखाली आणणे, वर्षातून एकवेळ तरी परगण्याचा दौरा करून नवीन जमिनीचा सारा ठरविणे, गावपातळीवरील कागदपत्रे तपासणे इ. देशमुखांच्या जबाबदाऱ्या होत्या. कर्नाटकात त्यांना 'नाडगौंडा' तर कोकणात 'देसाई' म्हणत असत. संकटसमयी तो शेतकऱ्यांना सारा सवलत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करीत असे. शत्रूपासून धोका निर्माण झाल्यास परगण्यातील लोकांचे रक्षण करणे, त्यांना सुरक्षित ठिकाणी हलविणे हे त्याचे महत्त्वाचे काम होते. रयत व सरकार यांच्यातील दुवा म्हणून त्याला काम करावे लागत असे. प्रसंगी त्याला लष्करी चाकरी पण करावी लागे. गरज असेल तेव्हा एखाद्या गावच्या पाटलाची जबाबदारीपण सांभाळावी लागत असे.

देशमुख पाटलापेक्षा श्रेष्ठ होता. त्यामुळे त्याला हक्कपण विस्तृत होते. गावकरी मोफत त्याची कामे करत. त्याला भेटरूपाने वस्तू देत. धान्याचा काही हिस्सा त्याला मिळे. गावकऱ्याकडून काही रोख रक्कमपण मिळत असे. बलुतेदार आपल्या उत्पादनातील वस्तू भेट म्हणून त्याला देत, वेगवेगळ्या रूपाने विनामूल्य त्याची सेवा करत, वेगवेगळ्या वस्तूच्या खरेदी-विक्रीवर विशिष्ट प्रमाणात टक्केवारीने त्याला रक्कम मिळत असे. अर्थात, देशमुखांचे हक्क सर्वत्र सारखे नव्हते. पण एकूण ग्रामीण समाजरचनेत देशमुखांचे स्थान फार महत्त्वाचे होते.



**देशपांडे :** परगण्यातील हा एक वतनदार अधिकारी असून परगण्यातील सर्व कुलकर्ण्यांचा तो प्रमुख असे. त्याला देशमुखाप्रमाणे, वतनी जमीन असे. कुलकर्ण्यांच्या कामावर तो देखरेख ठेवीत असे. त्याला 'देशकुलकर्णी' असेही म्हणत. आपल्या कामासाठी तो देशमुखाला जबाबदार असे. गरज पडल्यास एखाद्या गावाच्या कुलकर्णीची काही काळासाठी त्याला कामे करावी लागत. सामान्यतः हे पद ब्राह्मणाकडे असे. देशपांडेस अनेक हक्क होते. पण वस्तू किंवा रकमेच्या रूपाने मिळणाऱ्या भेटी देशमुखांच्या निम्म्याने मिळत असत. या दृष्टीने हक्क किंवा मानपानाचे स्वरूप एकसारखेच होते. गावच्या गोतसभेला देशमुखांबरोबर हजर राहू शकत असे. कारण दोघांच्या वतनी जमिनी परगण्यातील अनेक खेड्यात असत.

**मिरासदार व उपरा :** खेडेगावात ७५ ते ८०% लोक मिरासदार असत. हे लोक जमीन कसत असत. ती जमीन त्यांच्या मालकीची असे. त्यांचा मिरासदार कुणबी असा उल्लेख केला जातो. वंशपरंपरेने ते जमीन कसत असत. सरकारकडे ठरावीक कर भरत असत. त्याचा जमिनीवरील हक्क नष्ट होत नसे. त्यांच्या हक्कांना 'मिरासी' असे म्हणत. ते गोतसभेत भाग घेत. जमीन कसणारा दुसरा एक वर्ग म्हणजे 'उपरा' होय. गावात कामे करून पोट भरण्यासाठी आलेले हे लोक असत. यांना गावात घर किंवा जमीन नसे. इतरांच्या जमिनीवर राबत असत. त्यांना गोतसभेत भाग घेता येत नसे.

**बलुतेदार :** गावच्या विकास व स्थैर्यासाठी फार महत्त्वाची कामगिरी करणारा वतनदारांचा हा एक घटक होय. गाव स्वयंपूर्ण राहण्यात बलुतेदारांची सेवा फार उपयुक्त होती. म्हणून त्यांना ग्रामसेवक असेही म्हणत असत. बलुतेदार या घटकास मोठा इतिहास आहे. बलुता या संज्ञेचा अर्थ खेड्याच्या सेवकाने ग्रामस्थांना पुरविलेल्या आवश्यक सेवेबद्दल त्याला मिळावयाचा धान्यरूपी वार्षिक भत्ता असा होता. पण पुढे बलुता मिळणारा स्वतःच 'बलुता' म्हणून ओळखला जाऊ लागला.

ब्रिटिश राजवटीत एक प्रशासक म्हणून काम करणाऱ्या ग्रँट डफ याने महाराष्ट्रातील बलुता पद्धतीचाही अभ्यास केला. त्यानंतर त्याने मराठ्यांचा इतिहास लिहिला. त्याने १२ बलुतेदारांची नावे दिली आहेत ती अशी – (१) सुतार (२) लोहार (३) चांभार (४) महार (५) मांग (६) कुंभार (७) न्हावी (८) धोबी (९) गुरव (१०) जोशी (११) भाट (१२) मुलाणा.

ग्रँट डफने याशिवाय १२ अलुतेदारांची नावे याप्रमाणे दिली आहेत – (१) सोनार (२) जंगम (३) शिंपी (४) कोळी (५) तराळ (६) माळी (७) डवरी गोसावी (८) घडसी (९) रामोशी (१०) तेली (११) तांबोळी (१२) गोंधळी. अर्थात ग्रँट डफ यांनी दिलेली यादी प्रातिनिधिक स्वरूपाची नाही. अन्य ग्रामसेवकांचीही नावे मिळतात.

डॉ. ए.आर.कुलकर्णी यांनी बलुतेदारांची विभागणी खालीलप्रमाणे तीन प्रकारांत केली आहे.

**१. व्यावसायिक वर्ग :** सुतार, लोहार, न्हावी, चांभार, कुंभार, धोबी इत्यादी.

**२. सेवक वर्ग :** महार, तराळ, मांग, रामोशी इ. यांना मात्र गावची हलकीसलकी कामे करावी लागत.

Scanned with CamScanner

**३. धार्मिक सेवा करणारा वर्ग :** जोशी, गुरव, ठाकूर, जंगम, मुलाणा इ. लोक धार्मिक स्वरूपाची कामे करत. उदा. गुरव मंदिरात पूजा-अर्चा करणे, जोशी मुहूर्त काढून देणे इत्यादी.

बलुतेदारांना त्यांच्या सेवेबद्दल गावकऱ्यांकडून सुगीच्या दिवसात शेतातील उत्पन्नाचा काही हिस्सा मिळत असे. तो बलुतेदारांचा हक्क असे. त्यांना वतनंही असे. बलुतेदार गोतसभेला हजर राहत. त्यात भाग घेत असत. डॉ. बाळकृष्ण यांच्या मते, प्रत्येक बलुता हा गावच्या प्रशासनात महत्त्वाची कामगिरी बजावत असे. या व्यवस्थेचे मूळ १३ व्या शतकात मिळते. मोठ्या गावात अनेक कारागीर असत व प्रत्येकाची गिऱ्हाईक बांधून दिली जात.

या बलुतेदारी व्यवस्थेबद्दल कार्ल मार्क्स, बेडन, पॉवेल, मॅक्स वेबर या पाश्चात्त्य विचारवंतांबरोबर डॉ. हिरोशी फुकाजावा या जपानी तज्ज्ञांनी विचार करून त्याचे स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु विस्ताराचा विचार करून त्याचा तपशील देऊ इच्छित नाही.

## विद्यापीठीय स्वरूपाचे प्रश्न

### वस्तुनिष्ठ प्रश्न

१. मुघल काळात उत्तर भारतात .... चे उत्पादन सर्वाधिक होत होते.
*(अ) ज्वारी (ब) बाजरी (क) गहू (ड) तांदूळ*

२. मुघल काळात जमिनीच्या वर्गवारीत .... प्रकार येत नाही.
*(अ) पोलज (ब) परौती (क) चाचर (ड) सिम*

३. 'राजा तोरडमलचा बंदोबस्त' या नावाने .... ची जमीन महसूल पद्धत ओळखली जाते.
*(अ) हुमायून (ब) शेरशहा (क) अकबर (ड) बाबर*

४. झब्त या शब्दाचा अर्थ .... हा होय.
*(अ) प्रशासन (ब) न्याय (क) दान (ड) जमिनीचे मोजमाप*

५. मुघल कालखंडात परगण्याच्या शेतसारा वसुली अधिकाऱ्यास .... म्हणत.
*(अ) अमिला (ब) बितीकची (क) वजीर (ड) पाटील*

### लघूत्तरी प्रश्न / टीपा लिहा.

१. मुघलकालीन नगदी पिकांची माहिती सांगा.
२. मुघलकालीन पाणी संसाधन स्पष्ट करा.
३. मुघलकालीन महसूल पद्धतीची थोडक्यात माहिती सांगा.
४. झब्त पद्धतीची माहिती द्या.



### दीर्घोत्तरी प्रश्न

१. मुघलकालीन कृषी उत्पादनाचा आढावा घ्या.
२. मध्ययुगातील पाणी संसाधन व्यवस्थापनाची माहिती द्या.
३. मध्ययुगीन कृषी तंत्रज्ञान विशद करा.
४. जमीन महसूल पद्धतीची सविस्तर माहिती सांगा.
५. मुघलकालीन ग्रामीण समाजरचना स्पष्ट करा.

Scanned with CamScanner